# मिरा भाईंदर महानगरपालिका

## माहिती व जनसंपर्क विभाग

## प्रेसनोट

- **मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रात पावसाळी दिवसात पूरपरीस्थिती उद्भवल्यास "प्रभावीपणे पूर प्रतिसाद धोरणे" राबविणे संदर्भात एक दिवसीय कार्यशाळा संपन्न**

दिनांक ११ जून २०२४ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.), अतिरिक्त आयुक्त अनिकेत मानोरकर, उपायुक्त (आपत्ती व्यवस्थापन) डॉ. सचिन बांगर यांच्या उपस्थितीत महानगरपालिका क्षेत्रात पावसाळी दिवसात पूरपरीस्थिती उद्भवल्यास "प्रभावीपणे पूर प्रतिसाद धोरणे" राबविणे संदर्भात M/s. Aga Khan Agency for habitate India Mumbai ह्या संस्थेमार्फत नगरभवन, भाईंदर पश्चिम येथील सभागृहात कार्यशाळा आयोजीत करण्यात आली.

सदर कार्यशाळेत सार्वजनिक बांधकाम विभाग, पाणी पुरवठा विभाग, कार्यकारी अभियंता, उप-अभियंता, कनिष्ठ अभियंता, घनकचरा व्यवस्थापन विभागातील कर्मचारी, अग्निशमन विभाग, सार्वजनिक वैद्यकीय आरोग्य विभाग कर्मचारी, सर्व प्रभाग अधिकारी, परिवहन, उद्यान व वृक्ष प्राधिकरण व शिक्षण विभागातील कर्मचारी उपस्थित होते. कालांतराने मिरा भाईंदर शहरातील वस्ती, नागरिकांची संख्या बहुतांश प्रमाणात वाढत असल्याने शहरात पावसाळा दरम्यान पूरसदृश्य परिस्थिती झाल्यास महापालिका प्रशासनास विविध समस्यांना सामोरे जावे लागते. या समस्यांना मात देऊन पावसाळा दरम्यान आपत्कालीन परिस्थितीत शहरात सुव्यवस्था राखण्यात कशाप्रकारे मदत होईल याकरिता "प्रभावीपणे पूर प्रतिसाद धोरणे" राबविणे संदर्भात मार्गदर्शनपर कार्यशाळा राबविण्यात आली. शहरात नालेसफाई, गटारांची सफाई ही पूर्णपणे झाली असून यामध्ये पाठपुरावा करणाऱ्या सर्व स्वच्छता निरीक्षक, सफाई कर्मचारी यांचे मा. आयुक्त यांनी सर्व स्तरावर कौतुक केले. अतिवृष्टी झाल्यास शहरात पूर परिस्थितीत हाताळण्यास महापालिकेची सर्व यंत्रणा सज्ज असल्याचे मा. आयुक्त यांनी नमूद केले. त्याचबरोबर मा. आयुक्त सो. यांनी शहरातील पाणी साचण्याच्या सखल भागांची पाहणी केली. व याठिकाणी बसविण्यात आलेल्या सक्शन पंपची पाहणी केली व शहरातील अशा सर्व ठिकाणी तात्काळ सक्शन पंप बसविण्याचे निर्देश दिले. यंदाच्या वर्षी मागील वर्षीच्या तुलनेत पाऊस जास्त पडणार असल्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. तरी नागरिकांनी नाल्यांमध्ये, गटारांमध्ये व इतर सार्वजनिक ठिकाणी कचरा फेकू नये, आपल्या परिसराची स्वच्छता राखून मिरा भाईंदर महानगरपालिकेस सहकार्य करण्याचे आवाहन मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांच्या वतीने करण्यात येत आहे.